पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ३९**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २०/१२/२०१६** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. २०४८**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. २ चा माहे नोव्हेंबर २०१६ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. २ यांचे जा.क्र. उप–२/१३५९ दि. १३/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. २०४९**

सह महापालिका आयुक्त (परिमंडळ विभाग क्र. ४) च्या माहे नोव्हेंबर २०१६ पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांचे जा.क्र. सह मआ–४/१०१९ दि.१४/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. २०५०**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ३ च्या दि. १/११/२०१६ ते दि.३०/११/२०१६ पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. सह महापालिका आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. समआ–३/७०६ दि. १४/१२/२०१६ चे पत्र.

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. २०५१**

मा.शंकर केमसे, सभागृह नेता व मा.अरविंद शिंदे, विरोधी पक्षनेता यांचे दि.१५/१२/२०१६ चे पत्र.

**पुणे शहरामध्ये वास्तव्यास असलेले श्री.श्रीधर मल्काजी चिल्लाळ रा.सि.स.नं.२३४/क, बिबवेवाडी, पुणे - ३७ यांनी वयाच्या १६ व्या वर्षापासून स्वतःच्या डाव्या हाताची पाचही बोटे वाढवलेली असून आज पर्यंत कापलेली नाहीत. अशा प्रकारचा विक्रम करणारे श्री.चिल्लाळ हे जगातील एकमेव व्यक्ती असून त्यांच्या ह्या विक्रमाची नोंद “गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकोर्ड्स” मध्ये देखील झालेली आहे. त्यामुळे श्री.श्रीधर मल्काजी चिल्लाळ यांचे पुणे शहरातील राहते घर, पत्ता : सि.स.नं.२३४/क, बिबवेवाडी, पुणे - ३७ वरील मालमत्ता कर माफ करावा.**

**हिशोब तपासणी अहवाल**

**विषय क्र. २०५२**

मा.आरोग्यप्रमुख यांचे नियंत्रणाखालील पशुवध विभागाकडील सन २००१–०२ ते २०१५–१६ अखेर खाजगी मटण मार्केटमधील परवाना रजिस्टर व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/३७५ दि. १७/११/२०१६ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १३ सन २०१६–२०१७ चा विचारासाठी.

**विषय क्र. २०५३**

बांधकाम विभागाकडील घोरपडी, कोथरुड, वडगांव शेरी, औंध, शिवाजीनगर, येवलेवाडी विभागाच्या सन २०१६–१७ मध्ये प्रस्ताव मान्य करण्यात आलेल्या संमतीपत्रापैकी तपासणीसाठी उपलब्ध झालेल्या बांधकाम प्रस्तावांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/३९८ दि. ३०/११/२०१६ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १४ सन २०१६–२०१७ चा विचारासाठी.

**विषय क्र. २०५४**

कार्यकारी अभियंता कार्यालय, बांधकाम विभागाकडील पाषाण विभागाच्या कागदपत्रांची हिशोब तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१८१ दि. ७/७/२०१४ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १६ सन २०१४-२०१५ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/मुले/८५९ दि.१५/१२/२०१६ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता-ब.

**विषय क्र. २०५५**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील कोंढवा बुद्रुक कार्यालयाकडील ग्रामपंचायत कोंढवा बुद्रुक नमुना नं. ८ अ वरुन सन १९९९-२००० मधील कोंढवा बुद्रुक विभागाच्या आकारणी प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/६०८ दि. १३/१/२०१० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ६४ सन २००९-२०१० ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी जा.क्र.मआ/मुले/८७७ दि.१५/१२/२०१६ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता-ब.

## सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. २०५६**

वाहतुक नियंत्रण बेटे व सूचनात्मक फलक बसविणे (भाग-२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६९,९९,९९३/- पेक्षा २७.९१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५०,४६,२९४=९५ पर्यत काम करून घेणेस अधिक निविदा अटी शर्तीप्रमाणे भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणारी रक्कम कमी/अधिक करणेस तसेच इतर निविदा अटी शर्तीनुसार काम करून घेऊन देयक अदा करणेस यास अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे क्र.मआ/मुअ(प्र)/९०२ दि. १५/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. २०५७**

प्रभाग क्र. ६७ अ मध्ये ग्रे वॉटर शुध्दीकरणाचे पायलट प्रकल्पासाठी आंबिल ओढयालगत प्लॅन्ट बसविणे अंतर्गत साठवण टाकी व मलवाहिनीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे./श्री.विनोद मुथा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५७,७१,१७८/- पेक्षा १९.१९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.४६,६३,६८८=९४ अधिक भाववाढ सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु व मलनि/९२७ दि. १५/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. २०५८**

भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली जीप संवर्गातील वाहने पुरविणे (बी - २ पद्धतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी मे. स्वंयभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने पुणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा, एन डी स्कॉड, कर आकारणी व कर संकलन, आरोग्य व क्षेत्रिय कार्यालये व इतर विभागासाठी शासकीय कामासाठी भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली जीप संवर्गातील वाहने मे. स्वंयभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचे कडून आवश्यकतेनुसार जीप नॉन एसी १२ तास वापर रक्कम रुपये १९४०/- प्रति वाहन प्रति दिवस व जीप नॉन एसी २४ तास वापर रक्कम रुपये ३३४०/- प्रति वाहन प्रति दिवस या टेंडरदराप्रमाणे एकूण रक्कम रुपये १,२०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी वीस लाख फक्त) पर्यंत भाडे तत्वावर घेणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/९९० दि. ५/१२/२०१६ चे पत्र.

## सर्वात जास्त रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. २०५९**

पुणे पेठ शिवाजीनगर स.नं. १००/१०१ कुसाळकर पुतळया समोरील व्यावसायिक इमारतीमधील गाळा क्र. ६ भाडेतत्वावर ३ वर्षे कालावधीकरिता देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या असून क्र. १ चे निविदाधारक श्री. अशोक सुंका डोंगरे,पत्ता-३३/१२९ पी.एम.सी.कॉलनी कुसाळकर पुतळ्याजवळ पुणे-४११०१६ यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रूपये १९,६५०/-(अक्षरी रक्कम रु.एकोणीस हजार सहाशे पन्नास फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रूपये १९,४५३/-(अक्षरी रक्कम रु. एकोणीस हजार चारशे त्रेपन्न

फक्त) पेक्षा रक्कम रूपये १९७/-( अक्षरी रक्कम रू.एकशे सत्यान्नव फक्त) ने जास्त असल्याने त्यांना सदरचा गाळा ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर सेवाकर प्रचलीत दराने भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/८९२ दि. १५/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. २०६०**

पुणे पेठ शिवाजीनगर स.नं. १००/१०१ कुसाळकर पुतळया समोरील व्यावसायिक इमारतीमधील गाळा क्र. १ भाडेतत्वावर ३ वर्षे कालावधीकरिता देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या असून क्र. १ चे निविदाधारक सौ.माधवी राजेंद्र कामत,पत्ता. १९/१७१,मेन रोड,गोखलेनगर,,पुणे-१६ यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रूपये ९,६००/-(अक्षरी रक्कम रु.नऊ हजार सहाशे फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रूपये ९,४४८/-(अक्षरी रक्कम रु.नऊ हजार चारशे अठ्ठेचाळीस फक्त) पेक्षा रक्कम रूपये १५२/-( अक्षरी रक्कम रू.एकशे बावन्न फक्त) ने जास्त असल्याने त्यांना सदरचा गाळा ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर सेवाकर प्रचलीत दराने भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/८९३ दि. १५/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. २०६१**

पुणे वारजे स.नं.१८डी/४/३,२ येथिल योग मंदिर ताबा दिनांकापासून ३ वर्ष कालावधीसाठी भाडेतत्वावर चालविणेस देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ०२ निविदा प्राप्त झाल्या असून क्र. १ चे निविदाधारक मे.आर्या स्पोटर्स क्लब,तर्फे श्री.योगेश आश्रूबा सुर्वे, पत्ता- सातारा रोड,मु.पो.गाऊ्डदरा,पुणे यांनी देऊ केलेली वार्षीक रक्कम रूपये २,०२,०००/-(अक्षरी रक्कम रु.दोन लाख दोन हजार फक्त) ही मनपा निर्धारीत वार्षीक रक्कम रूपये १,४४,०००/-(अक्षरी रक्कम रु.एक लाख चव्वेचाळीस हजार फक्त) पेक्षा रक्कम रूपये ५८,०००/-( अक्षरी रक्कम रू.अठ्ठावन्न हजार फक्त) ने जास्त असल्याने त्यांना शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर सेवाकर प्रचलीत दराने भरून घेणेस ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे सदरचे मंदिर मक्ता पद्धतीने देणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ आणि मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/८९४ दि. १५/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. २०६२**

पुणे पेठ शिवाजीनगर स.नं. १००/१०१ कुसाळकर पुतळया समोरील व्यावसायिक इमारतीमधील गाळा क्र. २ भाडेतत्वावर ३ वर्षे कालावधीकरिता देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या असून क्र. १ चे निविदाधारक श्री.अविनाश नंदकिशोर काळे, पत्ता-१०३०, गोखलेनगर,पुणे-४११०१६ यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रूपये ९,६१०/-(अक्षरी रक्कम रु.नऊ हजार सहाशे दहा फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रूपये ९,४४८/-(अक्षरी रक्कम रु.नऊ हजार चारशे अठ्ठेचाळीस फक्त) पेक्षा रक्कम रूपये १६२/-( अक्षरी रक्कम रू.एकशे बासष्ठ फक्त) ने जास्त असल्याने त्यांना सदरचा गाळा ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर सेवाकर प्रचलीत दराने भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/८९५ दि. १५/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. २०६३**

पुणे पेठ शिवाजीनगर स.नं. १००/१०१ कुसाळकर पुतळया समोरील व्यावसायिक इमारतीमधील गाळा क्र. ७ भाडेतत्वावर ३ वर्षे कालावधीकरिता देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ०३ निविदा प्राप्त झाल्या असून क्र. १ चे निविदाधारक श्री.रॉबिन विनोद गोयल,पत्ता. ३२/१०,प्रतिक नगर,विश्रांतवाडी,,पुणे-६. यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रूपये ९,६५०/-(अक्षरी रक्कम रु.नऊ हजार सहाशे पन्नास फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रूपये ९,४४८/-(अक्षरी रक्कम रु.नऊ हजार चारशे अठ्ठेचाळीस फक्त) पेक्षा रक्कम रूपये २०२/-( अक्षरी रक्कम रू.दोनशे दोन फक्त) ने जास्त असल्याने त्यांना सदरचा गाळा ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी

व शर्तीप्रमाणे मक्ता पद्धतीने देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर सेवाकर प्रचलीत दराने भरून घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/८९६ दि. १५/१२/२०१६ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. २०६४**

पुणे पेठ मौजे खराडी स.नं. ६३/१/२, ६३/१/३, ६३/१/४, ६३/१/५ येथील ३० मी.डी.पी.रस्त्याचे ८५४१.७७ चौ.मी. क्षेत्र टी.डी.आर./एफ.एस.आय देणेपोटी मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत दि. १७/१/२०१३ व दि. २९/८/२०१६ रोजी पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात आलेले असून ७/१२ सदरी दि. २४/५/२०१३ रोजी व मिळकत पत्रिकेवर दि. २९/८/२०१६ रोजी पुणे महानगरपालिकेच्या नावाची नोंद झालेली आहे. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेत आलेल्या ३० मी.डी.पी.रस्त्याचे ८५४१.७७ चौ.मी. क्षेत्राची तडजोडीने टि.डी.आर./एफ.एस.आय.पोटी मोबदला देण्यात येणार असल्याने सदर मिळकतीमधील जागेचा भूसंपादनाचा उद्देश पुर्ण झालेला आहे. त्यानुसार सदर मिळकत भूसंपादन प्रकरणातून कायमस्वरुपी वगळणेबाबत मान्यता मिळणेस व मान्यतेप्रमाणे मा.जिल्हाधिकारी, पुणे व विशेष भूमिसंपादन अधिकारी क्र. १६ पुणे यांना कळविणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/६०८ दि. ३/१०/२०१६ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. २७/१२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०६५**

स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा १०० कोटी इतका हिस्सा 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड' यांना अदा करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उआ(वि)/७४५ दि.५/११/२०१६ चे पत्र.

१)मे.केंद्र शासनाच्या आदेशाप्रमाणे वित्तीय वर्ष सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या दोन वर्षासाठी र.रुपये १०० कोटी इतकी रक्कम खालील अर्थशिर्षकावरुन 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड' ला अदा करणेस अर्थशिर्षक आरई६४अे१०१, यावरती ज.ने.रा.श.पु.अ., अमृत व स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत मनपाचा हिस्सा, तरतुद र.रुपये १,१७,९७,३१,७००/-

२) 'पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड' यांचे नावे धनादेश/धनाकर्ष काढणेस

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १५/१२/२०१६ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. २०६६**

शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत फळे व अंडयाचा समावेश करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शिमं/८९७ दि. १५/१२/२०१६ चे पत्र.

१) अल्प मुदतीची निविदा काढणेस

२) मा.महा.आयुक्त यांचे निवेदनात नमुद केलेल्या रकमेच्या वर्गीकरणास रुपये ३,६८,००,०००/-

३) सदर योजनेसाठी येणाऱ्या अंदाजे खर्च रक्कम रुपये ३,६८,००,०००/- मान्यता मिळणेबाबत

**विषय क्र. २०६७**

पुणे महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ व्या जयंती निमित्त विविध प्रभागात टेंडर न काढता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणेस व सहभागी कलाकारांना आरटीजीएस मार्फत त्यांच्या बँक अकाऊंटवर ठरलेले मानधन आदा करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/बालगंधर्व/९०६ दि. १५/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. २०६८**

सन २०१६-१७ साठी पुणे मनपाच्या विविध खात्यासाठी व वॉर्डस्तरीय निधी तसेच इतर निधी मधून डेस्कटॉप संगणक , ऑल ईल वन संगणक , लेझर प्रिंटर, मल्टीफंक्शनल प्रिंटर, सर्क्नर (फ्लॅट बेड), युपीएस वार्षिक दर करार पद्धतीने पुरविणे या कामी मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रातील कोष्टक क्र.३ नुसार मे. प्रियाटेक सोल्युशन, पुणे यांचे कडुन रक्कम रु.१,४५,००,०००/- तसेच मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रातील कोष्टक क्र.४ नुसार

मे.यश कॉम्प्युटर सर्व्हिसेस पुणे यांचेकडुन र. रु. ५,००,०००/- असे एकुण र.रु. १,५०,००,०००/-( सर्व करासह) पर्यंत वाढीव खरेदी करणेस म्हणजेच पूर्वीच मान्य (कोष्टक क्र.१ व २) खरेदी र.रु.२५०,००,०००/-अधिक वाढीव र.रु. १,५०,००,०००/- असे एकूण रक्कम रू. ४,००,००,०००/-पर्यंत खरेदी करणेस व त्याप्रमाणे करारनामा करणेस व त्या पोटी बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/९१९ दि. १५/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. २०६९**

पुणे महानगरपालिकेच्या शहर अभियंता कार्यालयाकडील बांधकाम संदर्भात टि.डी.आर. पोटी सर्च टायटल करिता वकील फी आदा करणेसाठी खालीलप्रमाणे र.रुपये २० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र.मआ/शअ/९३२ दि.१५/१२/२०१६ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, बांधकाम नियोजन नगररचना व नगरविकास योजना, नगर अभियंता कार्यालय, RE23A118, १३.बांधकाम नियोजन नगररचना व नगरविकास योजना, क नगर अभियंता यांचे मुख्य कार्यालय, १ नगर अभियंता कार्यालय, १५ शहरात व समाविष्ट गावांत टि.पी.स्किम करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, शहर अभियंता बांधकाम नियोजन, RE23A117, १३.बांधकाम नियोजन नगररचना व नगरविकास योजना, क नगर अभियंता यांचे मुख्य कार्यालय, १ नगर अभियंता कार्यालय, १४ टि डी आर.पोटी सर्च टायटलकरिता वकील फी | --- | २० लाख |

**विषय क्र. २०७०**

डेवीस कप लॉन टेनिस स्पर्धा आयोजन करणेप्रित्यर्थ होणा-या खर्चा पैकी र रु २५ लाख महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन यांना आदा करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/क्रिवि/९३७ दि. १५/१२/२०१६ चे पत्र.

**विषय क्र. २०७१**

पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय वर्ष २०१६-१७ मधील सार्वजनिक वाहतुक सुधारणा व विशेष प्रकल्प अंतर्गत-१. स्वारगेट चौकात उड्डाणपुल बांधणे या कामामधून मुख्य अभियंता (प्रकल्प) कार्यालय अंतर्गत खालील नमूद प्रकल्पीय कामाकरिता वर्गीकरणाद्वारे एकूण रक्कम रुपये ७८५.०० लक्ष उपलब्ध होणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/९८३ दि.१५/१२/२०१६ चे पत्र.

१. हडपसर-गाडीतळ-सासवड फाटा येथे उड्डाणपुल बांधणे - रक्कम रुपये ५०.०० लक्ष

२. धनकवडी येथे उड्डाणपुल बांधणे - रक्कम रुपये ८५.०० लक्ष

३ . लुल्लानगर चौक, कोंढवा खुर्द येथे उड्डाणपुल बांधणे - रक्कम रुपये १५०.०० लक्ष

४ . मुंढवा स.नं. ८९ व ७१ दरम्यान पुणे-सोलापुर पुणे रेल्वे लाईनवर २४ मी. एच.एम.सी.एम.टी.आर.साठी रेल्वे ओलांडणीपुल बांधणे - रक्कम रुपये ५००.०० लक्ष

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**